# || श्रीमद्भगवद्गीता विवेचन सारांश ||वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् |देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् |||| श्रीमद्भगवद्गीता विवेचन सारांश ||

**अध्याय 10: विभूतियोग**

2/3 (श्लोक 6-21), शनिवार, 20 जानेवारी 2024

**विवेचक: गीता विशारद डॉ आशू गोयल जी**

YouTube लिंक: https://youtu.be/4UOehye69uQ

## भगवंतांच्या मुख्य विभूतींचे वर्णन

पारंपारिक पद्धतीने प्रार्थना आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. जगद्गुरू श्रीकृष्ण व परम पूज्य स्वामी गोविंद देव गिरि जी महाराज यांना वंदन करून सत्राची सुरुवात झाली.

**वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम्।**
**देवकीपरमानन्दं कृष्णं वंदे जगद्गुरुम्॥**

**योगेशं सच्चिदानंद वासुदेवं व्रजप्रियम्।**
**धर्मसंस्थापकं वीरं कृष्णं वन्दे जगद्गुरुम्॥**

भगवंताची असीम कृपा आपल्यावर आहे त्यामुळेच जीवन सफल करण्यास आपण उद्‌युक्त झालो आहोत. आपले या जन्मातील पुण्य कर्म, पूर्व जन्मीचे सुकृत, पूर्वजांचे आणि कुठल्यातरी जन्मात मिळालेले संतांचे आशीर्वाद यामुळेच आपण भगवद्गीतेचा अभ्यास करतो आहोत, ती समजून घेत आहोत आणि आचरणात आणण्याचा प्रयत्न करतो आहोत.

आपण दहाव्या अध्यायाचे चिंतन करीत आहोत. दहावा अध्याय **विभूतीयोग** आहे. मागील वेळेला आपण पाच श्लोक बघितले.

**10.6**

**महर्षयः(स्) सप्त पूर्वे, चत्वारो मनवस्तथा।**
**मद्भावा मानसा जाता, येषां(म्) लोक इमाः(फ्) प्रजाः॥10.6॥**

सात महर्षी, त्यांच्याही पूर्वी असणारे चार सनकादिक तसेच स्वायंभुव इत्यादी चौदा मनू हे माझ्या ठिकाणी भाव असलेले सर्वच माझ्या संकल्पाने उत्पन्न झाले आहेत. या जगातील सर्व प्रजा त्यांचीच आहे.

माझ्या ठिकाणी ज्यांचे चित्त आहे व माझ्या ईश्वरी सामर्थ्याने जे युक्त आहेत असे पूर्वी होऊन गेलेले जे अधिकारीक सात महर्षी व

चार मनू यांच्यापासून सर्व स्वर्गादी लोके व स्थावर प्रजा उत्पन्न झाली. हे सर्व माझ्याच संकल्पाची निर्मिती आहे.

सृष्टीच्या उत्पत्तीच्या समयी ब्रह्मदेवांनी **सनक, सनंदन, सनातन आणि सनतकुमार** हे चार ऋषी उत्पन्न केले. यांना सनकादी ऋषी म्हणतात. जेव्हा ब्रह्माजींनी हे चार विलक्षण ऋषी उत्पन्न केले तेव्हा त्यांना प्रजोत्पादन करून या जगाची वृद्धी करण्यास सांगितले. तथापि, सनत कुमारांना गृहस्थाश्रमात रस नव्हता! वडिलांचे घोषित कर्तव्य पूर्ण न करण्याच्या दोषापासून वाचण्यासाठी त्यांनी सुंदर स्तुती स्तोत्रे रचून ब्रह्मदेवांची स्तुती केली.

ब्रह्मदेव प्रसन्न झाले आणि त्यांनी सनकादी ऋषींना वर मागण्यास सांगितले. सर्व ऋषींनी ब्रह्मदेवांकडे, आमचे वय कायम पाच वर्षांचेच राहावे असा वर मागितला. हा वर प्राप्त करून हे सर्व महर्षी पाच वर्षांचेच राहिले. ते सदैव भगवंतांच्या कथा कीर्तनात रममाण राहतात. कथा श्रवणासाठी श्रोता मिळाला तर उत्तम, नाही मिळाला तरी ते एकमेकांमध्ये भगवंतांच्या कथांचे वर्णन करतात. सनकादिकांचे हे अनंतकाळापासून असेच चालू आहे. थोडक्यात प्रजा उत्पन्न करण्यासाठी ब्रह्मदेवांना यांचा काहीच उपयोग झाला नाही.

नंतर ब्रह्मदेवांनी सप्तर्षी उत्पन्न केले. या सप्तर्षींची नावे प्रत्येक मन्वंतरात निराळी असतात. ४३, २०,००० सौर वर्षांचे एक चतुर्युग अर्थात महायुग बनते. अशी ७१ महायुगे हा एका मनूचा काळ म्हणजे मन्वंतर होय. अशा १४ मनूंचा काळ मिळून ब्रह्मदेवांचा एक दिवस होतो. हे १४ मनू ब्रह्मदेवांचे मानसपुत्र होत. आता सातवे वैवस्वत मनू चालू आहेत. या मनूकाळात **अत्रि, भरद्वाज, गौतम, जमदग्नी, कश्यप, वसिष्ठ आणि विश्वामित्र** हे सप्तर्षी आहेत. भगवंत म्हणतात हे सर्व माझ्यापासून उत्पन्न झाले आहेत.

**10.7**

### एतां(म्) विभूतिं(म्) योगं(ञ्) च, मम यो वेत्ति तत्त्वतः।
### सोऽविकम्पेन योगेन, युज्यते नात्र संशयः॥10.7॥

जो पुरुष माझ्या ह्या परमैश्वर्यरूप विभूतीला आणि योगशक्तीला तत्त्वत: जाणतो, तो स्थिर भक्तियोगाने युक्त होतो, यात मुळीच शंका नाही.

पुढे, भगवंतांनी योगाचा एक अतिशय अनोखा प्रकार सांगितला तो म्हणजे अविकम्पेन योग, ज्याचा उल्लेख केवळ गीतेमध्ये आढळतो. येथे, **अविकम्पेन** म्हणजे स्थिर किंवा न थरथरणारे, तर विकम्पेन म्हणजे चढउतार, अस्थिर.

आपण पाहीले आहे की अनन्य भक्तीद्वारे कोणीही भगवंतांपर्यंत पोहोचू शकतो. पण, त्यासाठी स्थिर मनाची गरज असते. सहसा, आपले मन संघर्ष आणि चढउतारांनी भरलेले असते. जरी कोणी आपल्याशी नेहमीपेक्षा जरा जरी वेगळे वागले तरी आपले मन अस्वस्थ होते. आपण आपल्या वैयक्तिक समस्यांसाठी सरकारलाही सोडत नाही, ईश्वराला तर कायम दोष देत राहतो. मग त्याच्या भक्तीत स्थिर कसे राहावे?

अतिशय छोट्या गोष्टीने आपण घरच्यांशी दिवस दिवस अबोला धरतो आणि मग कोणी विचारले नाही तरी रागावतो. अत्यंत क्षुल्लक कारणाने आपले मन सहज विचलित होते. भगवंत म्हणतात, जो माझी विभूती तत्त्वतः जाणतो त्याचे मन निश्चल, स्थिर होते.

भगवंताला जाणून घेण्यासाठी, त्याची भव्यता समजून घेणे आवश्यक आहे. भगवंतांनी स्पष्ट केले की ज्यांना त्यांच्या विभूती समजतात त्यांना त्यांच्या प्रकृतीचे गुरुत्व आणि महत्त्व समजते कारण ते त्यांच्या प्रकटीकरणांवर लक्ष केंद्रित करतात. हे ज्ञान चढउतारांशिवाय त्यांचे मन स्थिर ठेवण्यास मदत करते.

जे लोक त्याच्या विभूतींना मूलभूत स्तरावर समजून घेतात, ते त्याला त्याच्या सारस्वरूपात ओळखतात आणि अशा प्रकारे ते अविकम्पेन योग साधतात.

भगवान आता स्वतःच्या दैवी स्वरूपाचे विस्ताराने वर्णन करणार आहेत.

**10.8**

**अहं(म्) सर्वस्य प्रभवो, मत्तः(स्) सर्वं(म्) प्रवर्तते।**
**इति मत्वा भजन्ते मां(म्), बुधा भावसमन्विताः॥10.8॥**

मी वासुदेव सर्व जगाच्या उत्पत्तीचे कारण आहे आणि माझ्यामुळेच सर्व जग क्रियाशील होत आहे, असे जाणून श्रद्धा व भक्तीने युक्त असलेले बुद्धिमान भक्त मज परमेश्वरालाच नेहमी भजतात.

भगवान म्हणतात की मी सर्व सृष्टीचा स्रोत किंवा उत्पत्ती आहे. येथे वापरलेला शब्द अहं म्हणजे “मी”. हा “मी” हा परमेश्वर आहे. मी भौतिक स्वरूपापुरता मर्यादित नाही.

आपल्या इष्टदेवतेप्रमाणे इथे अहं चा अर्थ घ्यावा. भगवंत इथे ' मी वासुदेव ' असे म्हणतात. कोणासाठी तेच ' मी शिव ', कोणासाठी ' मी राम ' असे असेल. ही सर्व अखेरीस त्या परमात्म्याचीच रूपे आहेत. आपण म्हणतो, सर्व भगवंतांच्या इच्छेने होते. इथे इच्छा याचा अर्थ शक्ती असा घ्यायला हवा.

ज्याप्रमाणे वीज ही बल्बमधील प्रकाशाचे कारक म्हणजेच स्रोत असते, त्याशिवाय प्रकाश नसतो, त्याचप्रमाणे पंख्याला वीज पुरवल्यास वारा देखील निर्माण होतो. तसेच भगवान एक शक्ती म्हणून कार्य करतात जी त्या विजेसारखी आहे जी प्रत्येक गोष्टीच्या कार्याच्या मागील शक्ती आहे. तरीही, ती कसे कार्य करते यासाठी भगवान थेट जबाबदार नसतात. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना हे आपल्या कृतीचे परिणाम असतात; प्रत्येक गोष्टीचा आदिम स्रोत असल्याने तोच सृष्टीला चालवतो; सर्व काही त्याच्याद्वारे टिकून आहे.

मी सर्व जगाचे कारण असून माझ्यापासूनच जगताची स्थिती, नाश, त्याचे फळ, भोग इत्यादी यांची प्रवृत्ती होते असे जाणून ज्ञानी पुरुष अत्यंत श्रद्धेने माझे भजन करतात.

**10.9**

**मच्चित्ता मद्गतप्राणा, बोधयन्तः(फ्) परस्परम्।**
**कथयन्तश्च मां(न्) नित्यं(न्), तुष्यन्ति च रमन्ति च॥10.9॥**

निरंतर माझ्यात मन लावणारे आणि माझ्यातच प्राणांना अर्पण करणारे माझे भक्तजन माझ्या भक्तीच्या चर्चेने परस्परांत माझ्या प्रभावाचा बोध करीत तसेच गुण व प्रभावासह माझे किर्तन करीत निरंतर संतुष्ट होतात आणि मज वासुदेवातच नेहमी रममाण होत असतात.

या श्लोकाचे सार नवव्या अध्यायातील चौतीसाव्या श्लोकासारखे आहे जेथे

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु |**
**मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः || ९.३४ ||**

भगवान म्हणाले: "नेहमी माझाच विचार करा, माझी भक्ती करा, माझी उपासना करा आणि मला नमस्कार करा. तुझे मन आणि शरीर मला अर्पण करून तू नक्कीच माझ्याकडे येशील.”

आणि अठराव्या अध्यायात,

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु |**

**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे || १८.६५ ॥**

भगवान म्हणाले: "नेहमी माझाच विचार करा, माझी भक्ती करा, माझी उपासना करा आणि मला नमस्कार करा. असे केल्याने तू नक्कीच माझ्याकडे येशील. ही माझी तुला प्रतिज्ञा आहे, कारण तू मला खूप प्रिय आहेस."

भगवंत इथे सत्संगाची महती सांगतात. ते म्हणतात, त्यांना मन अर्पण करणारे नेहमी त्यांच्या भजन-कीर्तनात दंग असतात आणि त्याने ते संतुष्ट होतात. भगवंतांना मन अर्पण कसे करावे, तर हे संतांचा संग केल्याने शक्य होते. महापुरुषांचे दर्शन, दैवी गुण असलेल्यांचे सान्निध्य, त्यांचा सहवास यामुळे मनात सात्त्विक भाव उत्पन्न होतात. केवळ चांगल्या लोकांच्या सतत सहवासाने आपल्यात बदल होऊ लागतात. आपल्यापैकी अनेकांना खात्रीने हा अनुभव गीता पठणाचे वर्ग, विवेचन सत्र इथे सातत्याने लावलेल्या नुसत्या हजेरीने आला असेल. सतत चांगल्या विचारांच्या लोकांबरोबर राहिले की आपल्या वृत्तीत देखील बदल होतो.

उदाहरणार्थ, गीता परिवारमध्ये, आपण सात्त्विक प्रवृत्तीच्या लोकांसोबत स्वतःला वेढून घेतो तेव्हा आपण आपल्यामध्ये झालेले परिवर्तन लक्षात घेऊ शकतो. अर्जुनासारख्या सव्वीस दैवी गुणांचे प्रदर्शन करणाऱ्या साधकांचा सहवास आपण ठेवतो तेव्हा आपण त्यांना नैसर्गिकरित्या आत्मसात करतो. आपल्या आंतरिक प्रवृत्तींमध्ये बदल झाल्यामुळे, आपली धारणा बदलल्यामुळे आपले ज्ञान विस्तारते.

जेव्हा जेव्हा कोणाला ध्यान किंवा उपासना करावीशी वाटते, ज्याला गीता पाठ करायची असते किंवा सेवा करायची असते, तेव्हा तो कुठलेही साधन पकडून त्यात गुंततो, तेव्हा त्याद्वारे आपले कार्य पूर्ण होते. भगवंत म्हणतात की असे केले तर तो भक्त सतत समाधानी राहतो.

विवेचक स्वामीजींसोबत अयोध्येला तीर्थयात्रेला गेले होते, परत येत असताना एक गृहस्थ त्यांच्या सोबत होते आणि त्यांनी प्रश्न विचारला की, माणूस सतत समाधानी आणि आनंदी कसा राहू शकतो? महापुरुष नेहमी आनंदी दिसतात याचे कारण काय? तेव्हा विवेचक म्हणाले की जोपर्यंत आपला आनंद भौतीक गोष्टींवर म्हणजे आजूबाजूच्या लोकांवर, वस्तूंवर आणि परिस्थितीवर अवलंबून असतो तोपर्यंत आपण आनंदी कसे राहू शकतो? वस्तू, परिस्थिती आणि लोक, सर्वसाधारणपणे या तीन गोष्टींमध्ये आपल्याला आनंद मिळतो. जर आपण एखाद्याला भेटलो तर आनंद होतो किंवा जर आपल्याला काही मिळाले तर आपण आनंदी होतो . अशा प्रकारच्या सुखाची अनुभूती कधीच जास्त काळ टिकत नाही; याउलट दु:ख दीर्घकाळ टिकते. पण अशा भौतिक गोष्टींऐवजी आतून समाधान मिळू लागले की आतल्या आनंदातले समाधान कायमस्वरूपी होते.

महापुरुषांच्या जीवनात आंतरिक समाधान असते. त्यांना कोणत्याही बाहेरच्या व्यक्ती, वस्तू, परिस्थितीत सुख-दु:ख वाटत नाही. चवदार गाजराचा हलवा असो वा कोरडी भाकरी यातले काहीही दिले तरी दोन्हीही ते सारख्याच उत्साहाने खातात आणि त्यांची संतुष्टी दोन्हीमध्ये सारखीच राहते. आपण पाहतो की महाराज चांदीच्या ताटात जेवतात, पण महाराजांना फरक पडत नाही. देणाऱ्याच्या मनात फरक असू शकतो पण महाराजांच्या मनात फरक असू शकत नाही. जो स्वतःमध्ये आनंद घ्यायला शिकला त्याला बाह्य परिस्थितीने फरक पडत नाही.

आपल्या मनात सदैव विचारांचे तरंग उत्पन्न होत असतात. कित्येकदा हे तरंग मारावे लागतात, जसे चहा प्यायची तीव्र इच्छा होते, ती मारावी लागते किंवा तिला वळण द्यावे लागते म्हणजे त्याऐवजी गरम पाणी पिऊ असे वेगळे वळण देऊन ती शमवावी लागते.

या संदर्भात ब्रह्मानंदजींचे एक सुंदर भजन आहे.

**मन की तरंग मार लो, बस हो गया भजन।**
**आदत बुरी संवार लो, बस हो गया भजन॥**

**आये हो तुम कहा से, जाओगे तुम कहाँ।**
**इतना ही विचार लो, बस हो गया भजन॥**

**कोई तुम्हे बुरा कहे, तुम सुन कर क्षमा करो।**
**वाणी का स्वर संभाल लो, बस हो गया भजन॥**

**नेकी सभी के साथ में बन जाए तो करो।**
**मत सर बंदी का हर लो, बस हो गया भजन॥**

**नजरो में तेरी दोष है, दुनिया निहारते।**
**समता का अंजन ढाल लो, बस हो गया भजन॥**

**यह महल माँडिया ना तेरे साथ जायेगी।**
**सतगुरु की महिमा जान लो, बस हो गया भजन॥**

**अनमोल ब्रह्मानंद जो चाहिए सदा।**
**घट घट में राम निहार लो, बस हो गया भजन॥**

**10.10**

## तेषां(म्) सततयुक्तानां(म्), भजतां(म्) प्रीतिपूर्वकम्।
## ददामि बुद्धियोगं(न्) तं(म्), येन मामुपयान्ति ते॥10.10॥

त्या नेहमी माझे ध्यान वगैरेमधे मग्न झालेल्या आणि प्रेमाने भजणा-या भक्तांना मी तो तत्वज्ञानरूप योग देतो. ज्यामुळे ते मलाच प्राप्त होतात.

परम प्रेमाने माझे भजन करीत, माझ्याशी अखंड ऐक्य पावलेल्यांना, ते मला अखंड प्राप्त झालेले राहतील असा बुद्धियोग मी देतो, अर्थात त्यांच्या स्थिर झालेल्या बुद्धीचे मी संरक्षण करतो. आपल्यापासून त्यांची बुद्धी ढळू देत नाही.

तुलसीदास म्हणतात

**यह फल साधन ते नहीं होई।**
**तुम्हरी कृपा पाए कोई कोई।।**

लोभाच्या पाशात ज्याने आपली मान अडकवली नाही, तो भगवंतांसमान असतो. पण हे दैवी गुण केवळ साधनाने प्राप्त होत नाहीत. ते भगवंतांच्या कृपेनेच शक्य होते.

साधना केल्याने मनोभूमिका तयार होते. पण प्रत्यक्ष ज्ञान प्राप्त होण्यासाठी भगवंतांची कृपा व्हावी लागते. दिवसभरात थोडा वेळ तरी भगवंतापाशी बसावे. आपल्या कामांमध्ये त्याचे अनुसंधान ठेवावे. अनुसंधान ठेवताना फक्त देहाने नव्हे तर ते मनाने असावे. जपमाळेचे मणी फक्त हाताने ओढू नये, मुखाने नाम घेतो तेंव्हा त्या उच्चारात प्रेम असावे.

येथे लक्षात घेण्याजोगा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे **सततयुक्तानाम्**, सदैव युक्त, स्थिर; जिथे भक्त सतत भगवंत नामातच मग्न असतो. दैनंदिन कामे करताना एक साधक सहा अध्यायांचा सराव करतात असे त्या भक्ताने नमूद केले.

तथापि, हे यांत्रिकपणे करू नये कारण भगवान नमूद करतात की भक्ती **प्रीतिपूर्वकम्**, म्हणजे प्रेमासह असावी. स्वामीजींनी येथे यांत्रिक नामजपाचे एक सुंदर उदाहरण दिले, जेथे साधकाला नामजप करताना मशीन वरील बटण दाबण्याची इतकी सवय होती की संभाषण सुरू असतानाही तो तसे करत होता. याचा अर्थ त्याचे मन नामजपात पूर्णपणे गुंतलेले नव्हते, परंतु सवयीमुळे त्याचा देह तसे करत होता.

**10.11**

## तेषामेवानुकम्पार्थम्, अहमज्ञानजं(न्) तमः।
## नाशयाम्यात्मभावस्थो, ज्ञानदीपेन भास्वता॥10.11॥

हे अर्जुना! त्यांच्यावर कृपा करण्यासाठी त्यांच्या अंतःकरणात असलेला मी स्वतःच त्यांच्या अज्ञानाने उत्पन्न झालेला अंधकार प्रकाशमय तत्वज्ञानरूप दिव्याने नाहीसा करतो.

सर्वस्वी माझ्या ठिकाणी अनन्य झालेल्या भक्तांवर कृपा करण्याकरता त्यांच्या अंतःकरणात राहूनच त्यांचा अविवेकरुपी अंध:कार मी आपल्या प्रकाशमान ज्ञानदीपाने नाहीसा करतो.

भक्तांच्या स्थिर मनातील किंचितसे देखील चढ-उतार भगवंत जाणतात आणि ज्ञानाद्वारे प्रकाशित करून ते हे चढउतार दूर करतात. आपल्या धर्मग्रंथांमध्ये वेगवेगळ्या घटना आढळतात ज्या स्पष्ट करतात, की भगवंत भक्तांना त्याच्या उपस्थितीची आणि कृपेची खात्री देणारे मार्गदर्शन करतात. थोडक्यात भगवंत त्यांच्या कृपेने भक्तांच्या अंतःकरणातील अज्ञान दूर करतात.

भक्त प्रह्लाद आणि हिरण्यकशपू यांच्या प्रसिद्ध कथा आपण सर्वांनी ऐकल्या आहेत. प्रह्लाद हिरण्यकश्यपूचा मुलगा होता. तो भगवंतांचा निस्सीम भक्त होता. सदैव नारायणाचा जप तो करत असे. हिरण्यकश्यपूला हे मुळीच आवडत नव्हते. त्याने प्रह्लादाला हर प्रकारे समजावले पण प्रह्लादाने नामजप सोडला नाही. सामंजस्याचे सर्व उपाय थकल्यावर हिरण्यकश्यपूने दंडाचा प्रयोग सुरु केला. त्याने प्रह्लादाला उकळत्या तेलाच्या कढईत टाकले, हत्तीच्या पायाखाली दिले, होलिकेमध्ये जाळण्याचा प्रयत्न केला पण कशाचाच प्रह्लादावर काही परिणाम झाला नाही. तो मुखाने हरिनामाचा जप करतच राहिला. त्याला भगवंत सर्वत्र दिसत होते.

हिरण्यकश्यपूने प्रह्लादाला विचारले "तुझा नारायण खांबात आहे का?" प्रह्लादाने ' हो आहे ' असे उत्तर दिले. हिरण्यकश्यपूने खांब पेटवला आणि पुन्हा विचारले "आता सुद्धा तुला खांबात नारायण दिसतो का?" पेटलेला खांब बघून क्षणभर भक्ताच्या मनात चलबिचल झाली. अशा वेळी भगवंत भक्ताच्या मनातील किल्मिष त्यांच्या कृपेने दूर करतात. प्रह्लादाला पेटलेल्या खांबात एक मुंगी चालताना दिसली. त्याच्या मनात तात्काळ विचार आला जर पेटलेल्या खांबात जिवंत मुंगी दिसू शकते तर माझे भगवंत नक्कीच दिसू शकतील. त्याने पुन्हा " हो माझे भगवंत अजूनही मला खांबात दिसतात " असेच उत्तर दिले आणि खांबातून नरसिंह प्रकटले.

ज्ञानाचे दोन प्रकार आहेत - लौकीक ज्ञान आणि अलौकिक ज्ञान. तुम्हाला कोणी गाणे शिकवले, मोबाईल फोन कसा वापरायचा हे शिकवले, तुम्हाला गणित शिकवले, कला शिकवली असे सांसारिक ज्ञान दुसऱ्याला देता येते. हे लौकीक ज्ञान आहे. अलौकिक ज्ञान दुसऱ्याला देता येत नाही. अज्ञानाचे निवारण मात्र करता येते.

ध्रुवाची अशीच गोष्ट आहे. ध्रुव लहान होता, फक्त सात वर्षांचा होता. नारद मुनींच्या सांगण्यावरून त्याने भगवंतांची तपश्चर्या आरंभली. त्याच्या कठोर तपश्चर्येने भगवंत प्रसन्न झाले आणि त्याच्यासमोर प्रकटले. भगवंतांना साक्षात समोर बघून ध्रुवाला काही बोलताच येईना. सात वर्षाच्या त्या बालकाला नीट भाषा देखील येत नव्हती आणि साक्षात भगवंत समोर उभे होते. त्याच्या मनात असंख्य भाव दाटून आले पण शब्दांत व्यक्त करता येईनात. भगवंतांनी भक्ताला शंखाचा स्पर्श केला आणि ध्रुवाने भगवंतांची स्तुती आरंभली.

प्रभू श्रीरामांच्या भेटीप्रसंगी शबरीची अशीच अवस्था झाली होती.

**अधम ते अधम अधम अति नारी।**
**तिन्ह महँ मैं मतिमंद अघारी॥**

मी तर शूद्रातील शूद्र असून अज्ञानी आहे. ज्या गोष्टीची तिने आयुष्यभर वाट पाहिली, ज्यांच्या वाटेकडे ती डोळे लावून बसली होती ते समोर उभे राहिल्यावर ती मूक बघत राहिली. तिला काही सुचेना. तुमची स्तुती कशी करू, तुमची पूजा कशी करू मला काही कळत नाही असे ती प्रभूंना म्हणाली. मग प्रभूंनी तिला नवविधा भक्तीचा उपदेश केला. ते म्हणाले, यातील सर्व नऊ प्रकारे

तू माझी भक्ती करतेस.

**नवधा भगति कहउं तोहि पाहीं, सावधान सुनु धरु मन माहीं।**
**प्रथम भगति संतन्ह कर संगा, दूसरि रति मम कथा प्रसंगा।।**

आता माझी नवधा भक्ती सांगतो. तुम्ही लक्षपूर्वक ऐका आणि तुमच्या ते लक्षात ठेवा. पहिली भक्ती म्हणजे संतांचा सत्संग आणि दुसरी भक्ती म्हणजे प्रेम.

**सोइ जानइ जेहि देहु जनाई। जानत तुम्हहि तुम्हइ होइ जाई॥**

जे आपल्याला देखील ज्ञात नसते ते त्या भगवंताला ज्ञात असते. कारण त्यांनीच आपल्याला जन्म दिला आहे.

भागवतात एक कथा येते. एकदा नारद मुनी चाललेले असतात. त्यांना वाटेत एक तरुण स्त्री दोन वृद्ध अचेतन देहांशेजारी बसून शोक करताना दिसते. ते वृद्ध त्या युवतीची मुले असतात. तरुण स्त्रीची वृद्ध मुले पाहून नारदांना आश्चर्य वाटते. ते तिची चौकशी करतात. ती सांगते, " माझे नाव भक्ती. ज्ञान आणि वैराग्य ही माझी दोन मुले. " कलियुगात ज्ञान आणि वैराग्य क्षीण झाले आहेत त्याचे हे सुंदर रूपक आहे. या युगात भक्तीने भगवंतांची प्राप्ती होऊ शकते.

पुढील श्लोकात अर्जुनाने भगवंतांची स्तुती केली आहे.

**10.12, 10.13**

## अर्जुन उवाच

**परं(म्) ब्रह्म परं(न्) धाम, पवित्रं(म्) परमं(म्) भवान्।**
**पुरुषं(म्) शाश्वतं(न्) दिव्यम्, आदिदेवमजं(म्) विभुम्॥10.12॥**
**आहुस्त्वामृषयः(स्) सर्वे, देवर्षिर्नारदस्तथा।**
**असितो देवलो व्यासः(स्), स्वयं(ञ्) चैव ब्रवीषि मे॥10.13॥**

अर्जुन म्हणाला, आपण परम ब्रह्म परम धाम आणि परम पवित्र आहात. कारण आपल्याला सर्व ऋषिगण सनातन, दिव्य पुरुष, तसेच देवांचाही आदिदेव, अजन्मा आणि सर्वव्यापी म्हणतात. देवर्षी नारद, अमित, देवल व महर्षी व्यासही तसेच सांगतात आणि आपणही मला तसेच सांगता.

अर्जुन म्हणतो "भगवंता! तूच परब्रह्म आहेस, तूच परमधाम म्हणजे शेवटी प्राप्त होणारी गती आहेस, अत्यंत पवित्र तूच आहेस. शाश्वत, दिव्य, आदिदेव जन्मरहित व व्यापक असा पुरुष तो तूच आहेस. देवा सर्व ऋषी, देवर्षी नारद त्याचप्रमाणे असित, देवल, व्यास हे सर्व तुझ्याविषयी असेच सांगत असत आणि प्रत्यक्ष तू ही आपल्याविषयी असेच मला सांगत आहेस."

अरे भगवंता! तुझ्या प्रभावामुळे मला सर्व गोष्टी विश्वासार्ह वाटतात. तुम्ही हे माझे गुरू म्हणून सांगत आहात, शास्त्रेही तेच सांगतात आणि ऋषीमुनींनीही तेच सांगितले आहे. या तिन्ही गोष्टी जुळत आहेत, त्यामुळे माझा यावर दृढ विश्वास आहे.

**10.14**

**सर्वमेतदृतं(म्) मन्ये, यन्मां(म्) वदसि केशव।**
**न हि ते भगवन्व्यक्तिं(म्), विदुर्देवा न दानवाः॥10.14॥**

हे केशवा! जे काही मला आपण सांगत आहात, ते सर्व मी सत्य मानतो. हे भगवन्! आपल्या लीलामय ना दानव जाणत ना देव.

अर्जुन म्हणतो "हे केशवा! तू जे मला सांगतोस ते सर्व खरे आहे तुझ्या या व्यक्त सगुण श्रीकृष्ण स्वरूपाचा महिमा देव किंवा दानव यांपैकी कोणीही जाणू शकत नाहीत." याची अनेक उदाहरणे आहेत; इंद्राने गोकुळात भगवान श्रीकृष्णाला मुसळधार

पाऊस पाडून आव्हान दिले, ज्याचा प्रतिकार भगवंतांनी गोवर्धन पर्वत उचलून केला आणि त्यामुळे त्यांना गिरीधर (गिरीचा धारक) हे नाव मिळाले.

ब्रह्मदेवांनी देखील गोप गोपींना गायब करून भगवंतांची परीक्षाच घेतली. भगवंतांनी मायेने सर्व गोप गोपींची प्रतिसृष्टी उभी केली. ब्रह्मदेवांच्या हे लक्षात आल्यावर ते भगवंतांना शरण गेले.

नारदांच्या एकदा मनात आले की भगवंत सोळा हजार स्त्रियांबरोबर संसार कसा करतात ते पाहावे म्हणून ते भगवंतांच्या भेटीला गेले. नारदांना भगवंत आपल्या प्रत्येक घरी एकाच वेळी संसारात त्यांच्या पत्नी बरोबर रममाण दिसले. नारद भगवंतांची लीला पाहून थक्क झाले.

शांततेचा दूत म्हणून जेव्हा श्रीकृष्ण आले तेव्हा त्यांनी त्यांचे विराट रूप दाखवले. ते इतके तेजस्वी रूप केवळ भीष्म आणि विदुरच त्यांना त्यांच्या तेजातून प्रत्यक्ष पाहू शकले. तरीही, दुर्योधनाने भगवंताला शकुनीसमोर मायावी म्हटले. अशाप्रकारे, अज्ञानामुळे भगवंताला मनुष्य समजू शकत नाही.

**10.15**

**स्वयमेवात्मनात्मानं(म्), वेत्थ त्वं(म्) पुरुषोत्तम।**
**भूतभावन भूतेश, देवदेव जगत्पते॥10.15॥**

हे भूतांना उत्पन्न करणारे! हे भूतांचे ईश्वर! हे देवांचे देव! हे जगाचे स्वामी पुरुषोत्तमा! तुम्ही स्वतःच आपण आपल्याला जाणत आहात.

हे पुरुषोत्तम! हे जगतकर्त्या! हे जगन्नियंत्या! हे देवाधिदेवा! हे जगत्पते! तूच एक स्वतःच स्वतःला जाणू शकतोस.

हे भगवंता! तुझ्या निर्गुण स्वरूपाचा महिमा निर्मळ अंत:करणाच्या योग्यांनाच जाणता येतो; कारण ते स्वरूप निर्विकार, स्वानुभवरूप व रूपातीत असल्यामुळे आपल्या स्वप्रकाशरूप आत्मस्वरूपाने समजण्यासारखे आहे. दुसऱ्या कोणत्याही मार्गाने त्याचे ज्ञान होत नाही.

**10.16**

**वक्तुमर्हस्यशेषेण, दिव्या ह्यात्मविभूतयः।**
**याभिर्विभूतिभिर्लोकान्, इमांस्त्वं(म्) व्याप्य तिष्ठसि॥10.16॥**

म्हणून ज्या विभूतींच्या योगाने आपण या सर्व लोकांना व्यापून राहिला आहात, त्या आपल्या दिव्य वीभूती पूर्णपणे सांगायला आपणच समर्थ आहात.

हे भगवंता! ज्या विभूतींच्या द्वारा या त्रैलोक्याला तू व्यापून आहेस त्या आपल्या संपूर्ण दिव्य विभूती मला सांगा.

**10.17**

**कथं(म्) विद्यामहं(म्) योगिंस्, त्वां(म्) सदा परिचिन्तयन्।**
**केषु केषु च भावेषु, चिन्त्योऽसि भगवन्मया॥10.17॥**

हे योगेश्वर! मी कशाप्रकारे निरंतर चिंतन करीत आपल्याला जाणावे आणि हे भगवन्! आपण कोणकोणत्या भावांत माझ्याकडून चिंतन करण्यास योग्य आहात?

हे योगेश्वरा! तुझे अखंड चिंतन करण्याकरिता मी तुला कोठे कोठे जाणावे व कोणकोणत्या पदार्थांच्या ठिकाणी माझ्याकडून तुझे

चिंतन होण्यासारखे आहे?

**10.18**

**विस्तरेणात्मनो योगं(म्), विभूतिं(ञ्) च जनार्दन।**
**भूयः(ख्) कथय तृप्तिर्हि, शृण्वतो नास्ति मेऽमृतम्॥10.18॥**

हे जनार्दना! आपली योगशक्ती आणि विभूती पुन्हाही विस्ताराने सांगा. कारण आपली अमृतमय वचने ऐकत असता माझी तृप्ती होत नाही. अर्थात् ऐकण्याची उत्कंठा अधिकच वाढत राहाते.

हे जनार्दना! आपले योगसामर्थ्य म्हणजे बहुरूप होण्याचे सामर्थ्य व विभूती यांचे विस्ताराने वर्णन करून पुन्हा सांगा. तुमच्या वचनामृताचे कितीही श्रवण केले तरी माझी तृप्ती होत नाही. ज्या ज्या भावाचे ठिकाणी तुझे चिंतन करणे मला सोपे जाईल तो तो आपला योग मला स्पष्ट करून सांगा.

भगवान श्रीराम वनवासात जाण्यास निघाले. वाटेत वाल्मीकींच्या आश्रमात त्यांनी वाल्मिकींना, मी वनात कोठे राहावे असे विचारले. भगवंत सर्व जाणतात हे वाल्मिकी ओळखून होते. त्यांनी अत्यंत चतुराईने जे उत्तर दिले ते गोस्वामी तुलसीदासजी चौपाईतून सांगतात.

**सुनहु राम अब कहउँ निकेता। जहाँ बसहु सिय लखन समेता॥**
**जिन्ह के श्रवन समुद्र समाना। कथा तुम्हारि सुभग सरि नाना॥**
हे श्रीराम, तुम्ही बंधू लक्ष्मण आणि सीते समवेत कुठे निवास करावा हे मी सांगतो. तुमच्या अनेक सुंदर कथारूपी नद्या सामावून घेत ज्यांचे कान समुद्राप्रमाणे-

**भरहिं निरंतर होहिं न पूरे। तिन्ह के हिय तुम्ह कहुँ गुह रूरे॥**
**लोचन चातक जिन्ह करि राखे। रहहिं दरस जलधर अभिलाषे॥**
निरंतर भरत राहतात पण कधीही पूर्ण तृप्त होत नाहीत, त्यांचे हृदय तुमच्यासाठी उत्तम निवासस्थान आहे. तुमच्या दर्शनाचा मेघ दृष्टीस पडावा या अभिलाषेने ज्यांनी चातक दृष्टी लावली आहे -

**निदरहिं सरित सिंधु सर भारी। रूप बिंदु जल होहिं सुखारी॥**
**तिन्ह कें हृदय सदन सुखदायक। बसहु बंधु सिय सह रघुनायक॥**
आणि जे भरून वाहणाऱ्या नद्या, अथांग समुद्र, सुंदर तलाव याचा आपल्या सौंदर्याच्या एका थेंबापुढे अनादर करतात (अर्थात, आपल्या दिव्य सच्चिदानन्दमय स्वरूपाच्या एका अंगाचे जरासे देखील दर्शन झाले तर त्यापुढे स्थूल, सूक्ष्म आणि कारण या तीनही जगतातील अर्थात पृथ्वी, स्वर्ग आणि ब्रह्मलोक या सर्वांचे सौंदर्य तुच्छ मानतात), हे रघुनायका, अशा लोकांच्या हृदयरूपी सुखदायी भवनात आपण बंधू लक्ष्मण आणि सीतेसह निवास करा.

**राम चरित जे सुनत अघाहीं। रस बिसेष जाना तिन्ह नाहीं॥**
**जीवनमुक्त महामुनि जेऊ। हरि गुन सुनहिं निरंतर तेऊ॥**
रामजीचे चरित्र ऐकून जे तृप्त होतात (कंटाळतात) त्यांना त्याचे विशेष मर्मच कळले नाही. जे जीवन्मुक्त महान ऋषी आहेत, तेही भगवंताची स्तुती सतत ऐकत राहतात.

गोस्वामीजी म्हणतात ज्यांना भगवंतांच्या कथांमध्ये रस असतो त्यांना त्या कथांचा कधीही कंटाळा येत नाही, त्या पुनः पुन्हा ऐकाव्याशा वाटतात. आता अर्जुन देखील तेच म्हणतो आहे. तो भगवंतांना म्हणतो तुमची अमृतमय वचने ऐकताना तृप्ती होत नाही.

**10.19**

**श्रीभगवानुवाच**
**हन्त ते कथयिष्यामि, दिव्या ह्यात्मविभूतयः।**
**प्राधान्यतः(ख्) कुरुश्रेष्ठ, नास्त्यन्तो विस्तरस्य मे॥10.19॥**

श्रीभगवान म्हणाले, हे कुरूश्रेष्ठा! आता मी ज्या माझ्या दिव्य विभूती आहेत, त्या मुख्य मुख्य अशा तुला सांगेन. कारण माझ्या विस्ताराला शेवट नाही.

भगवान म्हणतात, "हे कुरुकुलात श्रेष्ठ असणाऱ्या अर्जुना! माझ्या विस्ताराला मर्यादा नसल्यामुळे मी आता तुला माझ्या दिव्य अशा मुख्य विभूती सांगतो."

**10.20**

**अहमात्मा गुडाकेश, सर्वभूताशयस्थितः।**
**अहमादिश्च मध्यं(ञ्) च, भूतानामन्त एव च॥10.20॥**

हे अर्जुना! मी सर्व भूतांच्या हृदयात असलेला सर्वांचा आत्मा आहे. तसेच सर्व भूतांचा आदी, मध्य आणि अंतही मीच आहे.

हे निद्रेवर विजय मिळवणाऱ्या अर्जुना! मीच सर्वांचा आत्मा असून सर्व भूतांच्या हृदयात आहे म्हणून सर्व भूतांचा आदी, मध्य व अंत मीच आहे.

**10.21**

**आदित्यानामहं(म्) विष्णु:(र्), ज्योतिषां(म्) रविरंशुमान्।**
**मरीचिर्मरुतामस्मि, नक्षत्राणामहं(म्) शशी॥10.21॥**

अदितीच्या बारा पुत्रांपैकी विष्णू मी आणि ज्योतींमध्ये किरणांनी युक्त सूर्य मी आहे. एकोणपन्नास वायुदेवतांचे तेज आणि नक्षत्रांचा अधिपती चंद्र मीच आहे.

आदित्यांत मी विष्णू असून प्रकाशवंतात मी किरणवान सूर्य आहे, आकाशमंडळातील नक्षत्रांमध्ये मी चंद्र आहे.

इथून भगवंत त्यांच्या विभूतींचे वर्णन करतात. आपण तेहतीस कोटी देव आहेत असे जाणतो. कोटी हा शब्द या ठिकाणी प्रकार या अर्थाने घेण्यात आलेला आहे. संस्कृत भाषेत 'कोटी' या शब्दाचा अर्थ करोड नसून 'प्रकार' असा आहे. त्यामुळे आपल्याकडे तेहतीस कोटी ही देवतांची संख्या नसून, त्याचे प्रकार आहेत, असे सांगितले जाते. तेहतीस कोटी देवतांकडे या संपूर्ण सृष्टीचे व्यवस्थापन असल्याची मान्यता आहे.

या तेहतीस कोटी देवतांमध्ये आठ वसू, अकरा रूद्र, बारा आदित्य, एक इंद्र आणि एक प्रजापती आहेत. या प्रत्येकाचे कार्य वेगवेगळे आहे. प्रत्येकाचा कार्यभार वेगळा असल्यामुळे याला कोटी म्हटले गेले आहे, असे सांगितले जाते. कोटी हा शब्द विशेषणात्मक आहे संख्यावाचक नव्हे.

बारा आदित्यांची नावे : अंशुमान, अर्यमन, इंद्र, त्वष्टा, धानू, पर्जन्य, पूषन, भग, मित्र, वरूण, वैवस्वत व विष्णू.

**इंद्र** - देवांचा राजा, हा स्वर्गावर राज्य करतो.
**धाता** - अर्थात ब्रह्मदेव, विधाता. हे सृष्टीकर्ता आहेत.
**पर्जन्य** - ही पर्जन्याची देवता आहे, ह्यांचा मेघांमध्ये निवास असतो.
**त्वष्टा** - यांचा वनस्पती आणि औषधींमध्ये निवास असतो. यांच्याद्वारे जीवनाला आधार प्राप्त होतो.
**पूषा** - हे अन्नधान्यात निवास करतात. यांतून पुष्टी मिळते.

**अर्यमा** - हे पितरांचे देव होत. सूर्यासंबंधित असलेल्या या देवतेचा दिवस आणि रात्रीवर अधिकार आहे.
**भग** - हा स्त्रियांच्या योनीत निवास करतो. देहाला ऊर्जा, चेतना आणि काम शक्ती प्रदान करतो. यामुळेच स्त्रियांना भगिनी देखील म्हणतात.
**विवस्वान** - ही अग्नी देवता आहे ज्याला सूर्यापासून तेज, उष्णता प्राप्त होते. यामुळे प्राण्याच्या शरीरातील अन्नाचे पचन होते.
**विष्णु (भगवान वामन)** - हे देवतांचे दानवांपासून रक्षण करतात. पृथ्वीला दैत्यांच्या त्रासातून मुक्त करतात.
**अंशुमान** - हे वायुरूपाने प्राण बनून देहात राहतात.
**वरुण** - यांचा जलतत्वाने देहात निवास असतो.
**मित्र** - विश्वाच्या कल्याणासाठी, साधूंच्या कल्याणासाठी हे तप करतात.

भगवंत म्हणतात या बारा आदित्यांमध्ये मी विष्णु, अर्थात भगवान वामन आहे.

एके काळी बळी नावाचा असुर राजा होता. हा भक्त प्रल्हाद याचा नातु होता. हा बळी नीतिवान सुद्धा होता आणि धार्मिकही होता. त्याने आपल्या राज्यात मोठे यज्ञ सुरु केले. यातुन तो मोठा दानधर्म सुद्धा करीत असे. त्याच्या द्वारातुन कोणी याचक रिकाम्या हाती परत जात नाही अशी त्याची दानशूर राजा म्हणुन ख्याती होती.

यज्ञ जेव्हा केला जातो तेव्हा तो देवतांना स्मरून त्यांना पुजून केला जातो. त्या यज्ञाचे यजमानाला पुण्य मिळते आणि त्यात पुजलेल्या देवतांना बळ मिळते असे म्हणतात. त्याने आणि शुक्राचार्यांनी या यज्ञाचे फळही देवतांना मिळणार नाही अशी काळजी घेतली.

स्वर्गातून बाहेर झालेले देवराज इंद्र आणि समस्त देव भगवान विष्णूंकडे याचना करायला गेले. यज्ञाचे बळ नाही, बळीला मारता येत नाही कारण गुरु शुक्राचार्य त्याला परत जिवंत करू शकतात आणि शंभर यज्ञ पूर्ण केले तर तो स्वतः इंद्रपदाला पोहचेल अशी भीती त्यांनी बोलुन दाखवली.

भगवान विष्णूंनी इंद्राला पुन्हा स्वर्ग मिळवुन देण्यासाठी आणि स्थिती पूर्ववत करण्यासाठी अवतार घेण्याचे ठरवले. त्यांनी महर्षी कश्यप आणि त्यांची पत्नी अदिती हिच्या पोटी जन्म घेतला. त्यांचे हे रूप अतिशय लहानखुरे होते. त्यांची उंची अतिशय कमी होती. त्यामुळे वामन असे त्यांचे नामकरण झाले. मग वामन यात्रेला निघाला.

इकडे बळीराजाचा शंभरावा यज्ञ सुरु झाला होता. गुरू शुक्राचार्य आनंदात होते. दूरदूरून याचक यज्ञात अपेक्षेने आले होते. बळीराजा प्रत्येकाला जे मागेल ते देत होता, पुण्य अर्जन करत होता. याचकांचे समाधान करण्यात त्याने कुठलीच कमी सोडली नाही. त्याचा खजिना रिकामा झाला होता.

तिथे वामन पोहोचला आणि राजासमोर याचना करायला उभा राहिला. वामनाचे गोड बालस्वरूप पाहुन सर्व स्तिमित झाले.

बळीराजाने वामनाला पाहुन हात जोडले आणि म्हणाला "हे बटु, तुझ्या आधी आलेल्या याचकांच्या इच्छा पूर्ण करता करता माझा भांडार रिकामे झाले आहे. क्षमा असावी पण आता माझ्याकडे देण्यासारखे धन शिल्लक राहिले नाही."

वामन म्हणाला. "राजा, आधी मला काय हवे आहे ते तरी जाणुन घ्या. मग ठरवा, तुम्ही मला इच्छित दान देऊ शकता किंवा नाही."

"ठीक आहे, सांग तुला काय हवे आहे?"

"मला फक्त तीन पावले जमीन हवी आहे."

सर्व जण हसायला लागले.

“काय? तीन पावले जमीन? अरे जमीनच मागायची तर एखादं गाव, एखादं नगर तरी मागायचं? त्रिलोकावर ज्याचं राज्य आहे अशा राजाकडे येऊन फक्त तीन पावले जमीन?”

“मला तेवढी बस आहे महाराज. बोला देणार का तुम्ही मला?”

“अरे पण तू एवढीशी जमीन घेऊन करणार तरी काय?”

“महाराज, तुम्ही आधीच्या याचकांना विचारलेत का की तुमचे दान घेऊन ते काय करणार? मग मला का विचारता?”

वामनाचे संभाषणचातुर्य बघुन राजाला कौतुक वाटत होते. परंतु शुक्राचार्यांना मात्र संशय यायला लागला होता. हे देवतांचे षडयंत्र असल्याची त्यांना शंका आली. त्यांनी राजाला सावध करण्याचा प्रयत्न केला.  “राजा, मला या बटूवर आणि त्याच्या विचित्र मागणीवर संशय येतोय, याच्याकडे लक्ष देऊ नका. हा कदाचित विष्णूचा अवतार आहे. चला आपण आपला यज्ञ पूर्ण करू.”

ह्या भाषणाचा उलटाच परिणाम झाला. आता बळीला वाटले साक्षात भगवान नारायण आपल्या यज्ञात ब्राह्मण रूपात आले आहेत तर त्यांना काहीतरी दान द्यायलाच हवे. शुक्रनीतीमध्ये दानाचे महत्त्व सांगितले आहे. शुक्रनीतीप्रमाणे आपल्या उत्पन्नाचे पाच भाग करावेत. पहिला हिस्सा चरितार्थ चालवण्यास वापरावा. दुसरा हिस्सा भविष्यासाठी गुंतवणूक म्हणून बाजूला ठेवावा. तिसरा हिस्सा कुळासाठी, संबंधितांसाठी आणि मग समाजासाठी, या क्रमाने खर्च करावा. याला दान समजत नाहीत. चौथा हिस्सा आपत्कालीन गरज म्हणून राखून ठेवावा आणि शेवटचा पाचवा हिस्सा दानासाठी वापरावा.

वामन म्हणाला, “मग घ्या ते जलपात्र आणि दानाचा संकल्प सोडा.”

बळीराजाने जलपात्र घेतले. शुक्राचार्यांची यात काही तरी षडयंत्र असल्याची खात्रीच पटली होती. त्यांनी बळी आपले ऐकणार नाही हे ओळखुन त्याच्या संकल्पात बाधा आणण्याचा प्रयत्न केला. ते सूक्ष्मरूपात त्या जलपत्राच्या पाणी ओतण्याच्या नळीत जाऊन बसले. त्यामुळे त्यातुन पाणी बाहेर येऊ शकत नव्हते.

वामनाने हे ओळखले. त्याने बळीराजाला सुचवले “काही तरी अडकले असेल त्या पात्रात. एखादे दर्भ (काडी) घेऊन त्यात टाकुन बघा, पाण्याचा मार्ग मोकळा होईल.”

राजाने तसे केले आणि दुर्दैवाने ती काडी सूक्ष्मरूपात बसलेल्या शुक्राचार्यांच्या डोळ्यात गेली आणि त्यांचा एक डोळा निकामी झाला. अतिशय संतप्त होऊन ते बाहेर आले आणि राजावर रागावून निघुन गेले.

बळीराजाने वामनाला वचन दिले होते त्यामुळे त्याने संकल्प सोडला आणि वामनाला त्याच्या राज्यात कुठेही तीन पावले जमीन घेण्याची परवानगी दिली.

आता वामनाने एक चमत्कार केला. आपला आकार वाढवत नेत महाकाय रूप धारण केले. मग एक पाय पृथ्वीवर आणि दुसरा पाय स्वर्गात ठेवून दोन पावले घेतली. आणि मग बळीला विचारले “आता तिसरे पाऊल कुठे ठेवू?”

आता बळीला प्रश्न पडला. त्याने ओळखले की स्वतः भगवान विष्णूच त्याच्या दारी याचक म्हणुन आले आहेत आणि आपली परीक्षा पाहत आहेत. तो देवासमोर खाली बसला आणि म्हणाला “तिसरे पाऊल माझ्या मस्तकावर ठेवा भगवान”. त्याने स्वतःला देवाला समर्पित करून टाकले.

वामनाने तिसरे पाऊल राजाच्या डोक्यावर ठेवले. बळीराजाची समर्पण वृत्ती, वचनबद्धता, दानशूरता या सगळ्यामुळे ते प्रसन्न झाले. भक्ताच्या या बोलण्याने भगवंत प्रसन्न झाले. ते म्हणाले, "राजा, मी तुला पाताळ लोकातील सुतलाचा राजा करतो." भगवंतांनी पाऊल बळीच्या मस्तकी ठेवले. वामनाने बळीला विचारले, "राजा, तुला आणखीन काही हवे आहे का?" बळी देखील चतुर होता. त्याने भगवंतांना त्याच्या सुतलातील राज्याचे पहारेकरी होण्याची विनंती केली. भगवंतांना ती मान्य करावी लागली.

इकडे लक्ष्मीदेवी भगवंतांची वाट पाहत राहिल्या. भगवंत काही परत येईनात. नारदांनी झाला प्रसंग लक्ष्मीदेवींना कथन केला आणि आता तुम्हालाच जाऊन भगवंतांना परत आणावे लागेल असे सांगितले. लक्ष्मीदेवी एका साधारण महिलेच्या रूपात सुतलात दाखल झाल्या. त्यांनी बळीकडे त्यांची बहीण आली आहे असा निरोप पाठवला. बळीने यथोचित आदर सत्कार करून लक्ष्मीदेवींना आपल्या दरबारात बोलावले. लक्ष्मीदेवी बळीला म्हणाल्या, "राजा, मी तुझी बहीण आहे." त्यांनी बळीच्या मनगटावर रक्षासूत्र बांधले. बदल्यात बळीने काही मागण्याची विनंती केली. आता लक्ष्मीदेवी आपल्या मूळ रूपात प्रकटल्या. बळी समजून चुकला. लक्ष्मीदेवींनी आपले पती भगवान विष्णूंना सेवेतून मुक्त करण्याची विनंती केली. बळीने लक्ष्मीदेवींची इच्छा पूर्ण केली. तेंव्हापासून रक्षाबंधनाची प्रथा पडली.

आजही कित्येक यज्ञांमध्ये ब्राह्मण रक्षासूत्राचा मंत्र म्हणतात -

**येन बद्धो बलि राजा, दानवेन्द्रो महाबल: ।**
**तेन त्वाम् प्रतिबद्धनामि रक्षे माचल माचल: ।।**

रक्षासूत्र बांधताना ब्राह्मण अथवा पुरोहित यजमानांना म्हणतात, ज्या रक्षासूत्राने दानवीर राजा बळीला धर्मबंधनाने बांधले होते त्याच धर्मबंधनात मी आपल्याला बांधतो. अर्थात धर्मकार्यासाठी प्रतिबद्ध करतो.

भगवंत पुढे अर्जुनाला सांगतात एकोणपन्नास वायुंमधील तेज मी आहे. दितीच्या गर्भाचे इंद्राने सात तुकडे केले त्याचे प्रत्येकी सात आणखीन तुकडे झाले. हे मिळून एकोणपन्नास वायू होत. भगवंत म्हणतात त्या सर्वांमधील तेज मी आहे. एकूण सत्तावीस नक्षत्रे आहेत. अश्विनी, भरणी, कृत्तिका, रोहिणी, मृगशीर्ष, आर्द्रा, पुनर्वसू, पुष्य, अश्लेषा, मघा, पूर्वाफाल्गुनी, उत्तराफाल्गुनी, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, ज्येष्ठा, मूळ, पूर्वाषाढा, उत्तराषाढा, श्रवण, धनिष्ठा, शतभिषा, पूर्वाभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा, रेवती अशी त्यांची नावे आहेत.

तैत्तिरीय संहितेत आणि अथर्ववेदात अठ्ठावीस नक्षत्रांचा उल्लेख आहे. त्यांमध्ये अभिजित हे ते अठ्ठावीसावे नक्षत्र आहे. परंतु कालांतराने हे नक्षत्र क्रांतिवृत्तावरून बाजूला सरकले म्हणूनच आज केवळ सत्तावीस नक्षत्रे मानली जातात. अभिजित नक्षत्र हे उत्तराषाढा आणि श्रवण नक्षत्र यांच्यादरम्यान आहे. उत्तराषाढा शेवटचा एक चरण व श्रवणाचा आरंभीचा एक चरण मिळून अभिजित नक्षत्र होते. भगवंत म्हणतात या नक्षत्रांचा स्वामी चंद्र, तो मी आहे.

इथे एक मिनिटाच्या हरिनाम संकीर्तनानंतर विवेचन सत्र संपले.
।।श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

---

आम्हाला विश्वास आहेकी आपणास विवेचनाची रचना वाचायला आवडली असेल. कृपया खालील दिलेल्या लिंकचा उपयोग करून आम्हाला आपली प्रतिक्रिया कळवा.

https://vivechan.learngeeta.com/feedback/

**विवेचन सार आपण वाचलात, धन्यवाद!**
आम्ही सर्व गीता सेवी, अनन्य भावाने प्रयास करत आहोत कि विवेचनाचा मजकूर आपणास शुद्ध स्वरुपात प्राप्त होईल. तरीही जर मजकूर आणि भाषा संबंधित काही चुका असल्यास आम्ही क्षमा प्रार्थतो.

---

**जय श्रीकृष्ण!**
संकलन: गीता परिवार - रचनात्मक लेखन विभाग

---

**प्रत्येक घरी गीता, प्रत्येक हाती गीता!**
या आपण सर्व गीता परिवाराच्या ह्या ध्येया साठी एकत्र होऊया, आणि आपले इष्ट-मित्र -स्नेहीजनांना गीता वर्गांचा उपहार देऊया.

**https://gift.learngeeta.com/**

---

गीता परिवाराने एक नवीन सुरुवात केली आहे. आता आपण पूर्वी संयोजित झालेल्या सर्व विवेचनांचे यूट्यूब व्हीडियो आणि पीडीएफ बघू शकता आणि वाचू शकता. कृपया खाली दिलेल्या लिंकचा उपयोग करा.

**https://vivechan.learngeeta.com/**

---

**|| गीता शिका, शिकवा, जीवनात आणा ||**
**|| ॐ श्रीकृष्णार्पणमस्तु ||**